**नि. फौ. खटला क्र.८६/२०१८**
**निशाणी क्र. ३१**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०१ चा पुरावा ::**
**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | बाबुराव हणमंत सोनकांबळे, |
| **वय** | : | ८० वर्षे, **धंदा** : मजुरी, |
| **राहणार** | : | जवळगा, ता. देवणी, जि. लातूर. |

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::**

मी आरोपींना ओळखतो त्यापैकी आरोपी सुनिता व किशन न्यायालयात हजर आहेत. विजयप्रकाश हा गैरहजर आहे. दि.२२/०६/२०१८ रोजी जवळगा येथील शेतामध्ये दुपारी ४.०० वाजता पेरणी करुन शेताबाहेर जात होतो. त्यावेळी तीन्ही आरोपी तेथे आले आणि त्यांनी मला आणि माझी पत्नी हारुबाई यांना लाथाबुक्कीने मारले. आरोपी विजयप्रकाशच्या हातात कुऱ्हाड होती, परंतु कुऱ्हाडीने मारले नाही. आरोपी किशनने मला लाथाबुक्याने मारले होते. आरोपी सुनीता व विजयप्रकाश यांनी हारुबाईला लाथाबुक्याने मारले. त्यावेळी तुराब मासुलदार यांचा मुलगा तेथे आला आणि त्याने आम्हाला सोडवले. त्यानंतर आम्ही घरी गेलो.

०२. त्यानंतर रात्री ०९.३० वाजता तिन्ही आरोपी माझ्या घरी आले. आरोपी विजयप्रकाश आणि सुनीता यांनी काठ्यांनी मला मारले. आरोपी किशनने माझ्या कपाळावर काठी मारली. त्यामुळे जखम झाली. आता मला मुद्देमालातील काठी दाखविली ती तिच आहे. त्यास वस्तू चिन्ह **'अ'** देण्यात येते. आरोपी विजयप्रकाशने माझ्या पत्नीच्या डोक्यावर आणि कमरेवर काठीने मारले. त्यामुळे माझ्या पत्नीला चालता येत नाही. त्यानंतर मी पोलीस ठाणे देवणी येथे गेलो. पोलीसांनी मला सरकारी दवाखान्यामध्ये पाठविले होते. दवाखान्यामध्ये माझा उपचार झाला त्यानंतर तेथील डॉक्टरांनी उदगीर येथील दवाखान्यामध्ये पाठविले. त्यानंतर मला लातुर येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता पाठविले. मी तेथे दि. ११/०७/२०१८ पर्यंत उपचार घेतला. त्यानंतर मला

सुट्टी मिळाली. मी त्यानंतर पोलीस ठाणे देवणी येथे गेलो. मी दिनांक १९/७/२०१८ रोजी पोलीस ठाण्यात घटनेबाबत अर्ज वजा खबर दिली. आता मला खबर दाखविली. ही तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि. ३२ देण्यात येते. आता मला नि. ३ वरील पहिली छापील खबर दाखविली. ही तिच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे.

सरतपास पूर्ण.

:: **आरोपी करिता विधीज्ञ श्री. एस.बी.पाटील यांनी अर्ज निशाणी ३३ सादर केला त्याप्रमाणे उलटतपास दि.२५/०८/२०२५ पर्यंत तहकूब** ::

श्रवणोत्तर स्वीकृत	सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि. २०/०८/२०२५.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.